**ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागाच्या सीमा निश्चित करण्यासाठी कार्यक्रम**

**१.**माहे जानेवारी २०२१ ते एप्रिल २०२२ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १९४४ ग्रामपंचायती तसेच माहे मे २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ७७७६ ग्रामपंचायती तसेच

२. आयोगाने दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेल्या प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमातील निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या सर्व ग्रामपंचायती

३. नव्याने स्थापित ग्रामपंचायती

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र.४/का.८
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ६ मे, २०२२

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींच्या मुदत संपण्यापूर्वी निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. रानिआ/मनपा २००५/प्र.क्र.४/का.०५, दिनांक २७/०१/२००५ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या सहा महिने अगोदरच्या कालावधीमध्ये, तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करता येणार नाही, असे यापूर्वीच शासनास कळविण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, आयोगाच्या दिनांक २७/०१/२०२२ च्या आदेशान्वये **माहे जानेवारी २०२१ ते नोव्हेंबर २०२१ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १८४९ ग्रामपंचायती , माहे डिसेंबर २०२१ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे ६७४७ ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायती, आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम योग्यरित्या न राबविल्यामुळे संपूर्ण निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या** ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागाच्या सीमा निश्चित करण्यासाठी कार्यक्रम देण्यात आला होता. त्यानुसार सुमारे ९७७६ ग्रामपंचायतींची प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द झाल्याचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाला आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० च्या पोटकलम (१) मधील खंड (ब) मधील सुधारणेअन्वये प्रभागांची विभागणी व त्यामधील सदस्य संख्या निश्चिती "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने राज्य शासनाने"करावयाची आहे. त्यामुळे दिनांक २७/०१/२०२२ च्या आदेशानुसार सुरु करण्यात आलेली प्रभाग रचनेची पुढील कार्यवाही यापुढे अधिनियमातील नवीन तरतुदीनुसार राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे करण्याबाबत आयोगाच्या दिनांक १४/०३/२०२२ च्या पत्रान्वये सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार अधिनियमातील मुद्दा क्र.६ नुसार सुनावणीच्या टप्प्यावर प्रभागाच्या सीमा निश्चित करण्याचा उक्त कार्यक्रम रद्द केल्याचे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

आणि ज्याअर्थी, **मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये दिनांक ०४/०५/२०२२ रोजी दिनांक १०/०३/२०२२ रोजीच्या प्रक्रियेपासून पुढील प्रक्रिया करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे उक्त ग्रामपंचायतींच्या प्रभागाच्या सीमा निश्चित करण्यासाठी दिनांक २७/०१/२०२२ रोजी दिलेल्या कार्यक्रमानुसार प्राप्त झालेल्या ज्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेणे प्रलंबित आहे, अशा हरकती व सूचनांवर सुनावणीच्या टप्प्यापासून पुढील कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.**

आणि ज्याअर्थी, ग्रामपंचायतींच्या निवडणुकांच्या मुख्य तीन टप्प्यांना (प्रभाग रचना व आरक्षण, प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन व प्रत्यक्ष निवडणूक) लागणारा कालावधी लक्षात घेता **प्रभागाच्या सीमा निश्चित करण्याच्या** कार्यवाहीस तात्काळ सुरूवात करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १० अ (४) नुसार मिळालेल्या व इतर अधिकारांचा वापर करुन, खालील ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचना कार्यक्रम राबविण्याबाबत आदेश देण्यात येत आहेत:-

i) **माहे जानेवारी २०२१ ते एप्रिल २०२२ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १९४४ ग्रामपंचायती तसेच माहे मे २०२२ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे ७७७६ ग्रामपंचायती,**

ii) **आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दि. २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम योग्यरित्या न राबविल्यामुळे संपूर्ण निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या ग्रामपंचायती**

iii) **तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायती**

# आदेश

ग्रामपंचायतींच्या सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असल्याने, त्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेऊन निवडणुका योग्यप्रकारे पार पाडाव्यात.

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण ) आदेश २०२१, दिनांक २४/११/२०२१ मध्ये प्रभाग रचना व आरक्षण करण्याची सविस्तर कार्यपध्दती नमूद केलेली आहे.** सदर प्रभाग रचना व आरक्षण आदेशामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १५/१२/२०२१ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने अंशत: सुधारणा करुन दिनांक २९/१२/२०२१ रोजी अंशत: सुधारीत आदेश क्र.१ निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपील (सी) क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.१९ जानेवारी, २०२२ रोजी आदेशित केल्यानुसार निवडणुकांचे कामकाज विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने **निवडणूक प्रभागांच्या हद्दी निश्चित करण्याचा टप्पा तत्पूर्वी पूर्ण करून घेण्याच्यादृष्टीने** आयोगाच्या दिनांक २४/११/२०२१ च्या प्रभाग रचना व आरक्षण आदेशामध्ये अंशत: सुधारणा करुन दिनांक २७/०१/२०२२ रोजी अंशत: सुधारीत आदेश क्र.२ निर्गमित करण्यात आले आहेत. **त्यानुसार योग्य ते बदल करण्यात यावेत.**

**मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये दिनांक ०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार उक्त ग्रामपंचायतींच्या प्रभागाच्या सीमा निश्चित करण्यासाठी दिनांक २७/०१/२०२२ रोजी दिलेल्या कार्यक्रमानुसार प्राप्त झालेल्या ज्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेणे प्रलंबित आहे अशा हरकती व सूचनांवर सुनावणीच्या टप्प्यापासून पुढील कार्यक्रम सोबत जोडलेल्या परिशिष्ट १ नुसार राबविण्यात यावा.**

उक्त सर्व आदेशातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी उपजिल्हाधिकारी, तहसिलदार तसेच इतर संबंधितांनी घ्यावी.

सोबत जोडलेल्या परिशिष्ट १ नुसार प्रभागाच्या सीमा निश्चित करण्याचा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र - परिशिष्ट १

प्रती -

१.प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.

**उक्त कालावधीतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात अनुदानाची पर्याप्त तरतूद (मागील अनुदानाच्या थकबाकीसह) करण्याबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी. तसेच या पत्रात निर्देश दिल्यानुसार ग्रामसेवकासह संबंधित गटविकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांची सक्रिय भूमिका व जबाबदारी राहील, याबाबतचे निर्देश देणारे पत्र आपणाकडून तातडीने निर्गमित करण्यात यावे.**

२.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

३.विभागीय आयुक्त (सर्व),

**४.जिल्हाधिकारी सर्व (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)**

**५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)**

६.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

७.सर्व निवडणूक कार्यासने

८.निवड नस्ती.

## परिशिष्ट १

**आयोगाचे क्रमांक - रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र. ४ /का.०८, दि. ०६/०५/२०२२ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र**

**माहे जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, आयोगाने दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेल्या प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमातील निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आयोगाने दिनांक २७/०१/२०२२ रोजीच्या प्रभागाच्या सीमा निश्चित करण्याच्या कार्यक्रमातील सुनावणीच्या टप्प्यापासून प्रभागांच्या सीमा निश्चित करण्यासाठी पुढील कार्यक्रम.**

| अ.क्र. | प्रभाग रचना टप्पा | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | i) प्राप्त झालेल्या ज्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेणे प्रलंबित आहे अशा हरकती व सूचनांवर उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे | १३/०५/२०२२ |
| | ii) आलेल्या प्रत्येक हरकती व सुचनांवर सुनावणीनंतर अभिप्राय नोंदवून अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे | १९/०५/२०२२ |
| | **प्रभाग रचना अंतिम करणे** | |
| २ | i) उपविभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तपासून जिल्हाधिकारी यांनी प्रभाग रचनेला अंतिम मान्यता देणे व स्वाक्षरी करणे | २४/०५/२०२२ |
| | ii) जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ मध्ये) व्यापक प्रसिध्दी देणे | २७/०५/२०२२ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र